संस्थापक - नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवाकाळ

रोखठोक बेधडक

संपादकीय....

॥ न मे भक्त : प्रणश्यति ॥

# वाढदिवस नव्हे, सत्तामस्तीचा हैदोस

राजकारण्यांना सत्तेचा माज कसा असतो याची अनेक उदाहरणे समोर येत असतात. अशांपैकीच एक ताजे उदाहरण म्हणजे उत्तर प्रदेशात मुलायमसिंग यांचा वाढदिवस साजरा करताना व्यक्त झालेली सत्तेची मस्ती आणि त्यांच्यात पक्षाचे स्वयंघोषित नबाब म्हणजे आझम खान यांनी ताजमहालविषयी उधळलेली मुक्ताफळे म्हणता येतील. राजकारण्यांना वाढदिवसाचे निमित्त म्हणजे आपली लोकप्रियता दाखविण्याची एक संधी वाटत असते. आपल्या नेत्याचा ७५ वा वाढदिवस इतक्या जंगी स्वरुपात साजरा व्हावा की तो नेता आपल्यामुळे एवढा मोठा झाला आहे हे चित्र निर्माण करण्याचा प्रयत्न आझम खान यांनी केला. मग ७५ फुटाचा अगडबंब केक बनविण्यापासून ते नेत्याच्या मिरवणुकीसाठी खास लंडनहून बग्गी मागविण्याचा अचाट आचरटपणा केला गेला. एकीकडे उत्तर प्रदेशात शेतकरी आत्महत्या करीत आहेत. सामान्य माणसाच्या सुरक्षिततेचे गंभीर प्रश्न निर्माण होत आहेत. बेरोजगारी, गरिबी यासारखे प्रश्न भेडसावत असताना मुलायम सिंग आणि त्यांच्या नावाने कव्वाली गाणाऱ्यांना पैसा उधळण्यासाठी हीच संधी सापडावी, हे दुर्दैवच म्हणायला हवे. केवळ सत्ता आणि लोकशाहीने दिलेल्या अमर्याद स्वातंत्र्याच्या मनमानी वापरामुळेच ही मस्ती करणे शक्य होते. यातला संतापजनक भाग असा की, याच वाढदिवसाच्या निमित्ताने लोकांना कांबळ वाटपाचे सवंग प्रदर्शन मांडले गेले हे कांबळ घेण्यासाठी आणि ते वाटण्यासाठी उडलेल्या झुंबडीमध्ये एका महिलेचा मृत्यू होण्याचा प्रकार घडला. तर या कार्यक्रमासाठी मुलायमसिंगांचे सत्तेने पोसलेले महाभाग जागोजागी दादागिरी करीत फिरत होते. अशाच एका नेत्याच्या गाड्यांचा ताफा टोलनाक्यावर अडवला गेल्यानंतर तिथल्या कर्मचाऱ्याला बेदम मारहाण केली गेली. लाठ्या काठ्यांनी झोडपले गेले. ही गुंडगिरी कशी आली तर तिथल्या राजकारण्यांनी ती पोसली आणि वाढवलीसुध्दा. या सत्तामस्तीचे तितकेच उद्दाम आणि उध्दट प्रदर्शन आझम खान यांनी केले. त्यांनी जेव्हा पत्रकारांनी या वाढदिवसासाठी एवढा पैसा कुठून आणला असा प्रश्न विचारला तेव्हा या आझम खान यांनी उपरोधिकपणे हा पैसा तालिबानने दिला, काही पैसा दाऊद इब्राहिम, अबू सालेम यांनी दिल्याचे ते म्हणाले. उर्मटपणा दाखविणारे आझमखान यांचे हे विधान राजकारणात कशी गुंडागर्दी घुसली आहे याचेच समर्थन करणारे ठरते.

## सामान्य जनता वेठीला

आपल्या देशात काही ठरावीक राज्यांमध्ये हा सवंगपणा सतत चालू असतो. प्रामुख्याने राजकारण्यांच्या नेतेगिरीसाठी त्यांच्या राज्यातल्या सामाजिक सरकारी यंत्रणेला वेठीला धरले जाते. त्यात कर्नाटक, तामिळनाडू, आंध्रप्रदेश, ओरिसा, बिहार, उत्तर प्रदेश, राजस्थान, हरयाणा ही राज्ये आघाडीवर असतात. दक्षिणेकडच्या राज्यात तर इतका भयंकर प्रकार घडतो की, तिथल्या एखाद्या राजकीय नेत्याला अटक वगैरे झाली किंवा एखाद्या नेत्याचा अगदी नैसर्गिक मृत्यू झाला तरी त्यातले अनेक चाहते थेट आत्महत्या करून आपल्या नेत्याविषयीचे प्रेम व्यक्त करतात. या नेत्याच्याही वाढदिवसांच्या अभिनंदनाचे सत्कारांचे एवढे जंगी कार्यक्रम होतात की, शहरभर ओंगळवाणी सजावट केली जाते. त्याला सजावट म्हणणेच अयोग्य आहे. ५०-५० फुटांचे कटआऊट लावले जातात. मोठमोठ्या मिरवणुका काढल्या जातात. दिवसभर शहरातल्या वाहतुकीची धुळधाण होते. कितीही तातडीने कामावर किंवा दवाखान्यात जायचे असेल तरी जागा मिळत नाही. शहरभर या राजकारण्यांच्या वाढदिवसाचा किंवा सत्काराचा हैदोस चालू राहातो. उत्तर भारत काय किंवा दक्षिण भारत काय, ही राजकीय वेठबिगारी इतक्या मोठ्या प्रमाणात आहे की, या प्रदेशांचा विकास का होत नाही हे त्यावरून लक्षात येते. कारण त्या त्या ठिकाणचे नेतृत्व हे स्वत:साठीच सत्ता राबवते आणि मालमत्ता गोळा करते. त्यांना आणि त्यांच्या कार्यकर्त्यांना पैसा ओरबाडण्याचे तेच एकमेव साधन वाटते. कर्नाटकसारख्या किंवा आंध्र प्रदेशासारख्या राज्यात बंगलोर हैद्राबाद ही इनफर्मेशन टेक्नॉलॉजीची मोठी केंद्रे आहेत. परंतु एवढे टॅलेंट किंवा बुध्दिमत्ता तिथे असताना तिथले सगळे तरुण परदेशासाठी कामे करतात. त्याठिकाणच्या सरकारकडून तिथल्या तरुणांना संधी मिळेल अशी कामेच दिली जात नाहीत. त्यांनी स्वत:चा उद्योग उभारावा म्हणून संधीच प्राप्त होत नाही. आंध्रात एन. टी. रामाराव यांनी स्वत:चे साम्राज्य असेच उभे केले. तामिळनाडूत एम. सी. रामचंद्रन आणि नंतर जयललिता यांनी आपला प्रभाव कायम केला. उत्तरेत मुलायम, लालू, मायावती अशांनी या राज्यांचा विकास करण्याऐवजी अविकसित ठेवण्याचे काम केले.

## आझम खानची चौकशी करा

आज जग कुठे जात आहे. देशातील इतर राज्ये काही प्रगती करीत आहेत. अन्य राजकीय नेते कसे वागत आहेत. याचा विचार करण्याची या मंडळींना गरजच वाटत नाही. वाढदिवसाचा हैदोस घालणे म्हणजे नेतृत्वाची दिवाळीखोरी जवळ आली असेच म्हणायला हवे. यापूर्वी भाजपाचे एक नेते लालजी टंडन यांनीदेखील आपल्या वाढदिवसाच्या निमित्ताने साडी वाटपाचा कार्यक्रम केला होता. त्यातही अशीच चेंगराचेंगरी होऊन सात आठजणांना आपले प्राण गमवावे लागले होते. यापुढे राजकारण्यांची सत्तामस्ती कायद्याने बंद पाडली पाहिजे. हे खाजगी कार्यक्रम करताना सरकारी यंत्रणेचा वापर होणार नाही याची दक्षता घेतली गेली पाहिजे. आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे यासाठी उधळला जाणारा पैसा कुठून आणला असा प्रश्न जेव्हा आझम खान यांना विचारला गेला तेव्हा त्यांच्या नाकाला मिरच्या झोंबल्या आणि त्यांनी सरळ सभ्य उत्तर देण्याऐवजी वाकड्यात शिरून तालिबानने पैसा दिल्याची वांग ठोकली आहे. याचा जाब आझम खान यांना विचारला गेला पाहिजे. असे विधान त्यांच्या तोंडून निघते कसे. एवढी हिम्मत होते याचा अर्थ लोकपटीने दिलेल्या स्वातंत्र्याचा अमर्याद वापर करण्याची चटक या घटीगणांना लागली आहे. आझम खान हे कितीही गमतीने उपहास्याने असे बोलले असले तरी त्यांनी भविष्यात अशी बेजबाबदार विधाने करू नयेत, असा बंदोबस्त करायचा असेल तर त्यांना त्याचा जाब विचारला गेला पाहिजे. गृहखात्याने, आयकर विभागाने या वाढदिवसावर झालेल्या खर्चाची चौकशी सुरू केली पाहिजे.